म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. 232
१९१९

REFBK-0001700
REFBK-0001700

म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
2·32
…ळपत
म. ग्रं. सं. ठाणें.

महाराष्ट्रभाषाविभूषण

कै० राम गणेश गडकरी यांचा

पानपतचा

# फटका

प्रकाशक

दत्तात्रय रंगनाथ

२८६ बुधवार,) पुणें शहर

REFBK-0001700
REFBK-0001700

मुद्रक

शंकर बापुजी मुजुमदार

किर्लोस्कर छापखाना, १४९१ कसबा, पुणें शहर.

आवृत्ती दुसरी

१९१९.

दा. क. 9600

# पानपतचा फटका.

कौरव पांडव संगरतांडव द्वापरकालीं होय अती ॥
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ १ ॥
जासुद आला कथी पुण्याला शिंदा दत्ताजी पडला ॥
कुतुबशहानें शिरचरणानें उडवुनि तो अपमानियला ॥ २ ॥
भारतवीरां वृत्त ऐकतां कोप अनावर येत महा ॥
रागें भाऊ बोले ‘ जाऊ हिंदुस्थाना नीट पहा ॥ ६ ॥
‘काळाशीं घनयुद्ध करु मग अबदल्लीची काय कथा ॥
दत्ताजीचा सूड न घेतां जन्म आमुचा खरा वृथा ॥ ४ ॥’
बोले नाना ‘ युक्ती नाना करुनी यवना ठार करा ॥
शिंद्यांचा अपमान नसे हा ; असे मराठ्या बोल खरा ’ ॥ ५ ॥
उदगीरचा वीर निघाला ; घाला हिंदुस्थानाला ॥
जमाव झाला ; तुंबळ भरला सेनासागर त्या काळा ॥ ६ ॥
तीन लक्ष दळ भक्ष कराया यवनाधीशा चालतसे ॥
वृद्धबाल ते केवळ उरले तरुण निघाले वीररसे ॥ ७ ॥
होळकराचे भाले साचे जनकोजीचे वीरगडी ॥
गायकवाडी वीर अघाडी एकावरती एक कडी ॥ ८ ॥
समशेराची समशेर न ती म्यानामध्यें धीर धरी ॥
महादजीची बिजली साची बिजलीवरती ताण करी ॥ ९ ॥
निघे भोंसले पवार चाले बुंदेल्यांची त्वरा खरी ॥
धीर गारदी न करी गरदी नीटनेटकी चाल करीं ॥ १० ॥

मेहेंदळे अति जळे अंतरीं विंचुरकरही त्याच परी ॥
नारोशंकर सखारामहरि सूड घ्यावया असी धरीं ॥ ११ ॥
अन्य वीर तें किती निघाले गणना त्याची कशी करा ॥
जितका हिंदू तितका जाई धीर ढरेना जरा नरां ॥ १२ ॥
भाऊ सेनापती चालती विश्वासातें घेति सवें ॥
सूड ! सूड मनिं सूड दिसे त्या सूडासाठीं जाति जवें ॥ १३ ॥
वीररसाची दीप्ती साची वीरमुखांवर तदा दिसे ॥
या राष्ट्राचे स्वातंत्र्याचे दृढस्तंभ ते निघति असे ॥ १४ ॥
वानर राक्षस पूर्वी लढले जसे सुवेलाद्रीवरती ॥
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ १५ ॥

[ २ ]

जमले यापरि पानपतावरि राष्ट्रसभा जणुं दुसरी दिसे ॥
वीर वीरमदयुक्त सभासद सेनानायक प्रतिनिधिसे ॥ १६ ॥
अध्यक्ष नेमिले दक्ष भाऊ अरिभक्ष्य कराया तक्षकसे ॥
प्रतिपक्ष खंडना स्वमत मंडना; तंबु ठोकिती मंडपसे ॥ १७ ॥
शस्त्र शब्द हीं सुरस भाषणें सभेंत करिती आवेशें ॥
रणभूमीचा कागद पसरुनी ठराव लिहिती रक्तरसें ॥ १८ ॥
एका कार्या जमति सभा या कृति दोघींची भिन्न किती ॥
बघतां नयनीं वाहतीलची पूर अश्रूचे स्वैरगती ॥ १९ ॥
पूर्ववीरबल करांत राहे. आहे सांप्रत मुखामधीं ॥
हाय तयांचे वंशज साचे असुनी झालों असे कुधी ॥ २० ॥
जमले यापरि पानपतावरि भारत सुंदर पुत्र गुणी ॥
युद्ध कराया रिपु शिक्षाया संरक्षाया यशा रणीं ॥ २१ ॥

[ ३ ]

आडदांड यवन रणमंडपिं जमलें; युद्धकांड येथोनि सुरु ॥
करिती निश्चय उभयवीर रणधीर " मारूं वा रणीं मरुं " ॥ २२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ... नं. ...

पुढें पडे दुष्काळ चमूंमधिं; अन्न न खाया खावांना ॥
म्हणती "अन्नावाचुनि मरण्यापेक्षां जाऊं चला रणा" ॥ २३ ॥
मग सेनेनें एक दिलानें निश्चय केला लढण्याचा तो.
स्वस्थ होळकर मात्र नीचतर पगडभाइ ते यवनांचा ॥ २४ ॥
परधान्य हरणमिष करुनि रणांगणिं पडले आधीं बुंदेले ॥
श्रीशिवराया युद्ध पहाया हाक द्यावया कीं गेले ॥ २५ ॥
धन्य मराठे ! धन्य यवन ते ! रणांगणामधिं लढणारे ॥
आम्ही त्यांचे वंशज केवळ हक्कांसाठीं रडणारे ॥ २६ ॥
आवेश प्रवेशें दोन्ही सैन्यामधें कराया युद्धखळी ॥
परी स्वार्थ अनिवार मार दे आर्यजनांमधिं करि दुफळी ॥ २७ ॥
आर्यजनांचें दैव हा नाचे अभिमानाचें रूप धरी ॥
करी वसति मनिं सदाशिवाच्या; होय आमुच्या उरा सुरी ॥ २८ ॥
सुरासुरी जणुं डाव मांडिला बुद्धिबळाचा भूमिवरी ॥
परि दुर्दैवें वेळ साधिली प्यादी आली आम्हांवरी ॥ २९ ॥
कलह माजला झालि यादवी नवीन संकट ओढवलें ॥
कारस्थानीं हिंदुस्थाना व्यापुनि पूर्णाचे नागविलें ॥ ३० ॥
कुणि यवनाचा बाप जाहला ताप तयाचा हरावया ॥
नया सोडुनी जया दवडुनी कुणी लाविला डाग वया ॥ ३१ ॥
कुणी दिल्लीची वाहि काळजी कोणी तख्तासाठिं झुरे ॥
कुणा लागला ध्यास प्रीतिचा; विचार सारासारिं नुरे ॥ ३२ ॥
लालन लालन करि कुणि साधी मर्जीनेची कुणि मरजी ॥
असे घसरले साफ विसरले युद्धरीति अति खडतर जी ॥ ३३ ॥
गारदीच मज फार रुचे जरि यवन न सोडि विश्वासा ॥
निजबंधुंची करणी ऐकुनी सोडिं वाचका ! निश्वासा ॥ ३४ ॥
कलहा करिती कार्य विसरती क्षुद्रवस्तूच्या अभिमानें ॥
जसे हल्लिचे लोक तोकसम कलहा करिती नेमानें ॥ ३५ ॥

नेमानेमाच्या या गोष्टीं कष्टी होतें मन श्रवणीं ॥
असो; बुडाली एकी बेकी राज्य चालवी वीर गणीं ॥ ३६ ॥
सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागली कलहाची ॥
शिपाईभाई परिनच चळले रीति सोडिली न मर्दांची ॥ ३७ ॥
नाहीं लढले लढणारही नच कुणी पुनरपी या जगतीं ॥
तसे मराठे गिलचे मोठे कलींत लढले पानपतीं ॥ ३८ ॥

## [ ४ ]

एके दिवशीं रवि अस्ताशीं जाता झाला विचार हा ॥
" प्रातःकालीं स्मरुनी कालीं युद्ध करूं घनदाट महा " ॥ ३९ ॥
निरोप गेला बादशहाला, युद्ध कराया उद्यां चला ॥
समरांत मराया कीर्ति वरा, जय मिळवुनि आह्मांवरी अचला ॥४०॥
सकल यामिनी आर्यवाहिनी करी तयारी लढण्याची ॥
वीरश्रीचा कळस जाहला परवा न कुणा मरणाची ॥ ४१ ॥
परस्परातें धीर मराठे गोष्टि सांगती युद्धाच्या ॥
वीरश्रीच्या शस्त्रकलेच्या जयाजयाच्या अश्वांच्या ॥ ४२ ॥
बोले कोणी माझा न गणी वंशाचि मृत्युभयासि कधीं ॥
आजा पणजा बापहि माझा पडला मेला रणामधीं ॥ ४३ ॥
बापसवाई बेटा होई खोटा होईल नेम कसा ॥
पोटासाठीं लढाई नच परि मान मिळविण्या हवा तसा ॥ ४४ ॥
कुणी धरी तलवार करीं तिस पाहुनी आनंदे डोले ॥
फिरवी गरगर करी खालीं वर वीर मराठा मग बोले ॥ ४५ ॥
" अफाट वाढीची ही बेटी मोठी झाली लग्नाला ॥
प्राणधनाचे व्याज घेऊनि उद्यांच देईन यवनाला " ॥ ४६ ॥
अशी चालली गडबड सगळी निद्रा कोणा नच आली ॥
कोठें गेली कशी पळाली रात्र न कोणाला कळली ॥ ४७ ॥

४८००

प्रभात रूपें इर्षा आली; भीति पळाली निशामिषें ॥
भय मरणाचें कैचें त्यांना; काय करावें हरा विषें ॥ ४८ ॥
शिंग वाजलें संगरसूचक कूच कराया मिळे मुभा ॥
धांवति नरवर समरभूमिवर; राहे धनगर दूर उभा ॥ ४९ ॥
हटावयाते देशदारिद्रा मुखा हरिद्रा लावुनियां ॥
कीर्तिवधूतें जाति वराया समरमंडपीं धावुनियां ॥ ५० ॥
शहावलीचा हली सारखा अताइ नामा पुत्रबली ॥
यवनदसी मुख्यत्व घेत की पावळिमधिं जसा कली ॥ ५१ ॥
प्रणव जसा वेदांत सदाशिव तसा आर्यबलसेनानीं ॥
विश्वासाते पाहूनि वदनी अंगुलि घातलि यवनांनीं ॥ ५२ ॥
आले यापरि रणभूमीवरि; जसें गात कवि या पुढतीं ॥
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ५३ ॥

( ५ )

वाढें जैसा दिवस वाढलें युद्ध तसें अतिनिकरानें ॥
हातघाइला लढाई आली अंबर भरले नादानें ॥ ५४ ॥
उभय वीरवर गर्जति " हरहर " " अल्ला अकबर " उल्हासें ॥
भासे आला प्रळय; यमाला दिली मोकळिक जगदीशें ॥ ५५ ॥
अश्वबीर गज भक्तमंडळी गोंधळ मारत देवीचा ॥
तलवारीच्या दिवट्या केल्या; सडा घातला रक्ताचा ॥ ५६ ॥
धूळ उडाली गुलाल झाली " उदे " गर्जिती भक्तबळी ॥
परस्परांचे बळी अर्पिती भूमि तर्पिती शिरकमलीं ॥ ५७ ॥
रणवाद्य भयंकर भराड बाजे शुद्ध न कोणा देहाची ॥
रणमदमादिरा मत्त जाहले, हले फणाही शेषाची ॥ ५८ ॥
मनुजेंद्रबला जणूं अंत न उरला देवेंद्राची नच परवा ॥
म्हणुनि धूलिकण नभीं धावुनि मेघसंघकीं रचिती नवा ॥ ५९ ॥

रक्तपाट अतिद्राट वाहती घाट बांधिले आस्थिंचे ॥
मृतगजतुरंग मकर खेळती; कृत्य अगाधचि वीरांचें ॥ ६० ॥
घोर कर्म हें बघुनी वाटे रविहि धरी निजसदनपथा ॥
कांपे थरथर स्थिर न क्षणभर इतरांची मग काय कथा ॥ ६१ ॥
यापरि चाले लढाइ; भ्याले दाढीवाले मग हटले ॥
पळती, धावति सैरावैरा; आर्यवीर त्यांवरी उठेल ॥ ६२ ॥
आर्यजनां आवेश नावेर; भरें कांपरें यवनांला ॥
ह्मणति "मिळाला जय हिंदुला लढाई आली अंताला" ॥ ६३ ॥
तोंच अताई दूरदृष्टिचा धीर देत निज सैन्याला ॥
स्वयें धांवला पुढें जाहला स्फूर्ति पुन्हां ये यवनांला ॥ ६४ ॥
त्वरित पूर्ववत समर चाललें हले भरंवसा विजयाचा ॥
दाढी शेंडी एक जहाली खेळ शहाच्या दैवाचा ॥ ६५ ॥
करी अताई जबर लढाई नाहीं उपमा शौर्याला ॥
त्यावरि ये विश्वास भासले कीं खानाचा यम आला ॥ ६६ ॥
विश्वासानें अति अवसानें खान पाडिला भूमिवरी ॥
करिवर चरणीं मरण तया ये, शरण एक मग यमनगरी ॥ ६७ ॥
धीर सोडितां वीर शहाचे पळती आवरती न कुणा ॥
शहावलीची कमाल झाली यत्न तयाचा पडे उणा ॥ ६८ ॥
पहात होता शहा खेळ हा दुरुनी; तोही घाबरला ॥
ह्मणे, "करावें काय न ठावें" दैव हात दे परि त्याला ॥ ६९ ॥
दक्ष वीर लक्षैकधीर तनुरक्षक सेनेसह धांवे ॥
म्हणे चमूला, "पळति यवन जे कंठ तयांचे छेदावे" ॥ ७० ॥
पुन्हां उलटले यवन लढाया हुकुम ऐकतां हा त्याचा ॥
शहा तयातें सहाय होतां मारा करिती जोराचा ॥ ७१ ॥
जसे लढावे वीर संगरीं काबिजन इच्छा मनिं करिती ॥
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढलें पातपतीं ॥ ७२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
काव्य नं.
ता.

नभोमध्यगत सूर्य होत मग युद्धाहि आलें मध्याला ॥
हाय हाय या आर्यभूमिचा भाग्यसूर्य तो शेवटला ॥ ७३ ॥
सदा आम्हांला विजय मिळावा प्रताप गावा जगतानें ॥
परि त्याकाळीं फुटक्या भाळीं तसें न लिहिलें दैवानें ॥ ७४ ॥
सदाशिवाचा उजवा बाहु राहु रिपुस्त्रीमुखविधुचा ॥
बाऊ केवळ म्लेंच्छजनांचा; भाऊ माधवरायाचा ॥ ७५ ॥
बेटा ब्राह्मण बादशहाचा; पेटा साचा वाघाचा ॥
वीर फुलांतील गुलाबगोटा; वाली मोठा धर्माचा ॥ ७६ ॥
ताण जयाची द्रौणीवर उद्धाण आणितां आर्यांला ॥
विजयाचा विश्वास; असा विश्वास; लागला शरत्याला ॥ ७७ ॥
मर्म हाणिं तो वर्मीं लागें कर्म आमुचें ओढवलें ॥
धर्मसभेला आत्मा गेला धर्मवधूकरिं शव पडलें ॥ ७८ ॥
अश्रू नयनी आणी लक्ष्मी प्रियभार्या त्या आर्याची ॥
उतरे चर्या अघा न मर्या; परि ये स्मृति तिस कार्याची ॥ ७९ ॥
करी विचारा वीराचारा द्वारा वीराची स्वमनीं ॥
" नाथघात सैन्यांत समजतां धीर उरेल न आर्यजनीं " ॥ ८० ॥
छातीचा करि कोट लोटिला; दुःखलोट अनिवार तरी ॥
नीट बैसवी प्रेता देवी धनुष्य त्याच्या दिलें करीं ॥ ८१ ॥
धन्य सती ती ! धन्य तिचा पति ! धन्याचि जननीजनकाला ॥
धन्य कवीचें भाग्य असे या म्हणुनि मिळे हें गायाला ॥ ८२ ॥
परि जें घडले लपेल कुठलें ? वेग फार दुर्वार्तेला ॥
अल्पची काळे भाऊस कळलें " गिळिलें काळानें बाळा " ॥ ८३ ॥
" हाय, लाडक्या काय कृत्य हें घाय काय हा भग्न करी "
गोंडस बाळा तोंड पुण्याला दावुं कसें कथि तोड तरी ॥ ८४ ॥

असा करी तो शोक ऐकुनी दुःख जाहलें सकळांला ॥
अश्वावरती स्वार जाहला भाऊराया मरण्याला ॥ ८५ ॥
व्यंग समजतां भंग कराया आर्यांच्या चतुरंग बळा ॥
सिद्ध जाहला शहा ; तयाला दैवानें आधार दिला ॥ ८६ ॥
फिरती मराठे आला वाटे अंत शिवाजी राज्याला ॥
भाऊराया योजि उपाया—तोहि वायां परि गेला ॥ ८७ ॥
मान सोडिला, साम जोडिला, दूत धाडिला होळकरा ॥
प्रसंग येतां मत्त किंकरा धनी जोडिती असें करा ॥ ८८ ॥
दूत निघाला सत्वर आला होळकराला नमन करी ॥
ह्मणें भाऊचा निरोप ऐका, साह्य करा या समयिं तरी ॥ ८९ ॥
' उणें बोललों प्रमत्त झालों बहु अपराधी मी काका ॥
माफ करा, मन साफ करा; या अफतींत मज नच टाका ॥ ९० ॥
मत्प्राणाची नाहीं परवा, बरवा समरीं मृत्यु हवा ॥
परीं लागतो डाग यशाला शिवरायाच्या; तो दुरवा ॥ ९१ ॥
देशकार्य हें व्यक्तीचें; नच सक्ती नको, भक्तीच हवी ॥
आशक्ति सर्वांची असंतां मिळवूं आतां कीर्ति नवी ॥ ९२ ॥
राग नका धरूं; आग लागते यशा; भाग हा सर्वांचा ॥
शब्द मुलाचा धरितां कैचा ? हाच मान कां काकाचा ॥ ९३ ॥
साह्य कराया यवन वधाया धीर द्यावया या काका ॥
असें विनविलें हात जोडिले दया न आली परि काका ॥ ९४ ॥
बट्टा लावी वयास; केली थट्टा ऐसी विनतीची ॥
रट्टा दे भूमातेला; धरि कट्टा वैरी मान तिची ॥ ९५ ॥
दुःखावरतीं डाग द्यावया करी होळकर हुकुम दळा ॥
" पळा, मिळाला जय यवनाला ', काय ह्मणावें अशा खळा ॥ ९६ ॥
फिरले भाले—भाले कैचे ? दैवची फिरले आर्यांचें ॥
पाहे भाऊ; वाहे नयनीं नीर; करपलें मन त्याचें ॥ ९६ ॥ ९७ ॥

निरोप धाडी पुन्हां तयाला पळा वांचवा प्राण तरी ॥
पळतांना परि कुटुंबकबिला न्यावा आमुचा सर्व घरीं ॥ ९८ ॥
घेत होळकर वीरवधूतें मग दक्षिणची वाट धरी ॥
देशहिताची करुनि होळी नाम होळकर सार्थ करी ॥ ९९ ॥
करी दुजा विश्वासघात हा; निजबंधूच्या दे साची ॥
परवशतेची माथी मोळी, हातीं झोळी भिक्षेची ॥ १०० ॥
काय कथावी युद्ध-कथा मग वृथा भाऊचा श्रम झाला ॥
धीर सोडुनी पळाति मराठे, पूर्ण पराभव त्या आला ॥ १०१ ॥
कोणी वेणीमधवधांवें; वारे तयाचा शिरीं जडे ॥
भारतरमणीकिंठतन्मणी धरणीवरती झणीं पडे ॥ १०२ ॥
भूदेवीची तुटे गळसरी; फुटे दैव कीं आर्यांचें ॥
आकाशाची कुऱ्हाड पडली; कडे लोटले दुःखाचें ॥ १०३ ॥
सैरावैरा आर्य धावती; हरहर ! कोणी नच त्रातां ॥
यवन करिती मग प्रळय भयंकर वदा कशाला तो आतां ॥ १०४ ॥
वर्णन करितां ज्या रीतीचें कुंठित होइल सुकविमती ॥
तसें मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ १०५ ॥

( ७ )

सन सतराशें एकसष्ट अतिनष्ट वर्ष या देशाला ॥
हर्ष मरे उत्कर्ष उरेना; सकळां आली प्रेतकळा ॥ १०५ ॥
फुटे बांगडी दीड लाख ती; राख जहाली तरुणांची ॥
आग पांखडी दैव आह्मांवर; मूर्ति अवतरे करुणाची ॥ १०५ ॥
घरोघरीं आकांत परोपरि; खरोखरीचा प्रळय दिसे ॥
भरोभरी रक्ताच्या अश्रू अबला गाळिती शोकरसें ॥ १०८ ॥
" दोन हरवली मोतिं; मोहोरा गेल्या सत्तावीस तशा ॥
रुपये खुर्दा नये मोजतां ,, वचना वदाति वृद्ध अशा ॥ १०९ ॥

घोर वृत्त हें दूतमुखानें कानीं पडलें नानाच्या ॥
" भाऊ भाऊ ,, करितां जाई भेटीस भाऊरायाच्या ११०
उघडा पडला देशतयानें हें नव संकट कां यावें ॥
दुःख एकटें कधिं न येत परि दुःखामागुनि दुःख नवें ॥ १११ ॥
धक्का बसला आर्ययशाला; तेथुनि जाई राज्य लया ॥
रघुनाथाचें धैर्य हरपलें, जोड उरेना हिमालया ॥ ११२ ॥
" नाथ ! चालला सोडुनि अबला, पाहु कुणाच्या मुखाकडे ॥
' बाळा ! कैसा जासी लोटुनि दुःखाचे मजवरती कडे , ॥ ११४ ॥
जिकडे तिकडे हंबरडे यापरी परिसती जन फिरतां ॥
कोणीकडेंही तरुण दिसेना; सेनासागर होय रितां ॥ ११४ ॥
उडे दरारा; पडे पसारा राज्याचा; बळ घेत रजा ॥
उघडे पडले मढें हत्तिचे कोल्हे त्याबरि करिती मजा ॥ ११५ ॥
भलते सलते पुढें सरकले, खरे बुडाले नीचकरीं ॥
मालक पडतां नीट बैसले पाटावरती बाण करी॥ ११६ ॥
नडे आमुची करणी आम्हां; खडे चारिले यवनांनीं ॥
तडे पडोनी यशपात्राला रडे सदोदित भूरमणी ॥ ११७ ॥
गंजीफांचा डाव संपला दिली अखेरी यवनांतें ॥
स्वातंत्र्यासह सर्वस्वातें, दूर लोटिलें निज हातें ॥ ११८ ॥
रुमशामाला धूम ठोकितां पुणें हातिचें घालविलें ॥
दुग्धासाठीं जातां मार्गीं पात्र ठेवुनी घरीं आले ॥ ११९ ॥
करि माधव परि उपाय पुढतीं परि ते पडती सर्व फशीं
घटिघडी उघडिल्या एकदां बसेल कैशी पुन्हां तशीं ॥ १२० ॥
जसा नदाचा ओघ फिरवा पात्रीं पडतां गिरीशिखरें ॥
पानपतच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे ॥ १२१ ॥
इतिहासाचें पान येथचें काळें झालें दैवबळें ॥
या देशांवर अपमानाची स्वारी दुःखासहित वळे ॥ १२२ ॥

राठी ग्रंथ संग्रहालय

सर्वस्वाचा नाश जयानें वर्णुं तयातें मी तां किती ॥
व्यास वर्णिता थकले यातें मग मी कीहें अल्पमती ॥ १२३ ॥
जसें झगडतां त्वरित फिरावी सकळ ग्रहोंची सरळ गति ॥
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ १२४ ॥

( ८ )

जें झालें तें, होऊनि गेलें फळ नच रडुनि लेशभरी ॥
मिळे ठेंच पुढल्यांस मागले होउ शहाणे अजुन तरी ॥ १२५ ॥
पुरें पुरे हें राष्ट्रविघातक परस्परांतिल वैर अहो ॥
पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्याहो ॥ १२६ ॥
भारत बांधव ! पहा केवढा नाश दुहीनें हा झाला ॥
परस्पराशीं कलहा करितां मरण मराठी राज्याला ॥ १२७ ॥
हा हिंदु, हा यवन, पारशी हा, यहूदि हा भेद असा ॥
नको नको हो, एकी राहो, सांगू आपणा किती कसा ॥ १२८ ॥
एक आईचीं बाळें साचीं आपण सारे हें स्मरुनी ॥
एक दिलानें एक मतानें यत्न करूं तद्धितकरणी ॥ १२९ ॥
कधीं रडकथा निजदेशाची वाचून ऐका हा फटका ॥
लटका जाउनि कलह परस्पर लागो एकीचा चटका ॥ १३० ॥
कौरवपांडव संगरतांडव द्वापरकालीं होय अती ॥
तसें मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ १३१ ॥


# ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स.

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स बुधवार पेठ, पुणें शहर.

आमचेकडे इंग्रजी, संस्कृत, मराठी, शालोपयोगी व
इतर सर्व पुस्तके विकत मिळतात.

फक्त लहान मुलांमुलींकरितां

# बाल–माला.

वार्षीक वर्गणी पुण्यांत ५ आणे व
बाहेर गांवीं ११ आणे

**नवीन सालास सुंदर छोटें पुस्तक
बक्षीस मिळेल**

राष्ट्रीय व्यापारी.
किरलोस्कर थिएटर, पुणें शहर.

# किर्लोस्कर छापखाना.

इंग्रज़ी, मराठी आणि संस्कृत छपाईचें हरएक काम
फारच सुंदर, शुद्ध व त्वरीत होतें.

**गिऱ्हाईक नेहमीं खुष असतें.**

भरपूर टाईप. मोहक बार्डरी.
आपलें काम हमेश किर्लोस्कर छापखान्याकडेच पाठवा.
किर्लोस्कर थिएटर, पुणें.

# रंगभूमीवरील सचित्र संगीत नाटकें.

## संगीत नाटकांचीं पुस्तकें

| | रु. | आ. |
|---|---|---|
| संगीत शारदा नाटक | १ | ० |
| सं. सौभद्र | ० | १२ |
| सं. रामराज्यवियोग | १ | ८ |
| सं. मृच्छकटीक | ० | १२ |
| सं. शाकुंतल | ० | १२ |
| सं. शापसंभ्रम | ० | १२ |
| सं. मानापमान | ० | १२ |
| सं. विद्याहरण | ० | १२ |
| सं. संत तुकाराम | ० | १० |
| सं. जन्मरहस्य | १ | ० |
| सं. सहचारिणी | १ | ० |
| सं. कुंजविहारी | १ | ० |
| सं. स्वयंवर | ० | १२ |
| सं पुण्यप्रभाव | १ | ० |
| सं. वीरविडंबन | १ | ० |
| सं. एकच प्याला | १ | ० |
| सं. हाच मुलाचा बाप | १ | ० |
| सं. संन्याशाचा संसार | १ | ० |
| सं वीरतनय | १ | ० |
| सं. मूकनायक | १ | ० |
| सं भावबंधन | १ | ० |
| सं. कृष्णकांचन | १ | ० |

| | | |
|---|---|---|
| सं. सुंदोपसुंद | १ | ० |
| सं विनोद | ० | १० |
| स. चित्रवंचना | ० | १० |
| सं. संशयकल्लोल | १ | ० |
| सं. प्रेमाभास | ० | १२ |
| सं. प्रेमशोधन | १ | ० |
| सं. राक्षसी महत्वाकांक्षा | १ | ० |
| प्रेमसंन्यास [ गडकरीकृत ] | १ | ० |
| कांचनगडची मोहना | ० | १२ |
| प्रेमध्वज | ० | १२ |
| चंद्रग्रहण | ० | १२ |
| भाऊबंदकी | ० | १२ |
| सवाई माधवराव | ० | १२ |
| कमला | ० | १२ |
| बायकांचें बंड | ० | १२ |
| मत्स्यगंधा | ० | १२ |
| विचित्रलीला | ० | १४ |
| हाच मुलाचा बाप | ० | १२ |
| चंद्रगुप्त | ० | १२ |
| तीन नाटकें तीन प्रहसनें | १ | ० |
| तुकाराम [ शिरवळकर ] | ० | १२ |
| तोतयाचें बंड | १ | ० |
| पद्मरात्न | १ | ० |
| वाटिका | ० | ८ |

वरील सर्व नाटकें रोख अगर व्ही. पी. ने मागविल्यास पाठवूं. ट. ख. शिवाय. मागविण्याचा पत्ता—

एम्. व्ही. आगाशे बुकसेलर पुणें शहर.